**Maharashtra State Board of Secondary and Higher Secondary Education,**
**Kolhapur Divisional Board, Kolhapur - 416004**
**महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,**
**कोल्हापूर विभागीय मंडळ, कोल्हापूर - ४१६००४.**

Phones : Chairman 2690829 Secretary 2691405 PBX-2696101,2696102,2696103 FAX:[0231]2690758
E-Mail: divsec.kop@gmail.com Web : sscboardkolhapur.in

क्र.कोविमं/माध्य./उ.मा./परीक्षा/ 1513
दिनांक :- 31/08/2023

प्रति,
प्राचार्य / मुख्याध्यापक,
सर्व मान्यताप्राप्त माध्यमिक शाळा व कनिष्ठ महाविद्यालय,
सातारा/ सांगली/ कोल्हापूर.

**विषय:- माध्यमिक शालांत प्रमाणपत्र (इ.10 वी) व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.12 वी) परीक्षा जुलै-ऑगस्ट 2023 करीता प्रविष्ठ विद्यार्थ्यांच्या मूळ गुणपत्रिका वितरणाबाबत..**

आपल्या शाळा / कनिष्ठ महाविद्यालयामार्फत माध्यमिक शालांत प्रमाणपत्र (इ.10 वी) व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.12 वी) परीक्षा जुलै-ऑगस्ट 2023 करीता प्रविष्ठ झालेल्या विद्यार्थ्यांच्या मूळ गुणपत्रिका या परिपत्रकासोबत हस्तपोहोच देण्यात येत आहेत.

1. प्रथमत: आपणास प्राप्त झालेल्या सर्व गुणपत्रिका आपल्याच शाळा / कनिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थ्यांच्या आहेत याची खात्री करावी. अन्य शाळा / कनिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थ्यांच्या गुणपत्रिका प्राप्त झाल्या असतील तर त्या सिलबंद करुन आपल्या प्रतिनिधीमार्फत त्वरित या कार्यालयाकडे जमा करण्यात याव्यात. तसेच आपल्या शाळा / कनिष्ठ महाविद्यालयातील एखाद्या विद्यार्थ्याची गुणपत्रिका प्राप्त न झालेस त्वरीत अखेर मंडळ कार्यालयाशी संपर्क साधावा.
2. सर्व गुणपत्रिकांवर मा.विभागीय सचिव यांची स्वाक्षरी असल्याची खात्री करावी. त्याचबरोबर गुणपत्रिकांवरील नोंदी उदा.विद्यार्थ्यांचे नाव, नावाचे स्पेलिंग व विषय इ. माहिती शाळा / कनिष्ठ महाविद्यालयाच्या अभिलेखावरुन बिनचूक तपासण्यात याव्यात. त्यानंतरच विद्यार्थ्यास गुणपत्रिका वितरीत करण्यात यावी.
3. गुणपत्रिकांमध्ये काही त्रूटी असल्यास दुरुस्तीसाठीचे प्रस्ताव गुणपत्रिका मिळाल्यापासून एक महिन्याच्या आत (दि.04/10/2023 अखेर) मंडळ कार्यालयात समक्ष सादर करण्यात यावेत. दुरुस्ती प्रस्तावासोबत खालीलप्रमाणे कागदपत्रे आवश्यक आहेत-
   - अ) प्रती गुणपत्रिकेतील प्रत्येक चूकीच्या नोंदीसाठी रु.200/- आणि नवीन गुणपत्रिकेसाठी रु.200/- असे एकूण रु.400/- शुल्क भरावे लागेल.
   - ब) शाळा / कनिष्ठ महाविद्यालयाच्या जनरल रजिस्टरमधील संबंधित विद्यार्थ्यांच्या नावाची नोंद असलेल्या पानाची प्राचार्यांनी प्रमाणित केलेली छायांकीत प्रत
   - क) दुरुस्ती यापूर्वीच म्हणजेच प्रिलिस्ट व प्रवेशपत्रे प्राप्त झाल्यानंतर का कळविली नाही याबाबत संबंधित मुख्याध्यापक / प्राचार्य व लिपिक यांचा विभागीय सचिव यांच्या नावे वस्तुनिष्ठ खुलासा सादर करावा. आपण दिलेला खुलासा हा समाधानकारक असावा.
4. आपल्या शाळा / कनिष्ठ महाविद्यालयामार्फत गुणपत्रिका दुरुस्तीचे परिपूर्ण प्रस्ताव विहीत मुदतीत मंडळ कार्यालयास प्राप्त झाल्यानंतरच दुरुस्तीची कार्यवाही केली जाईल. तद्नंतर काही त्रूटी राहील्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी आपल्या कनिष्ठ महाविद्यालयाची राहील याची नोंद घ्यावी.

(दत्तात्रय शंकर पोवार)
**विभागीय सचिव,**
**कोल्हापूर विभागीय मंडळ, कोल्हापूर**